# <u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ याची जबानी</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की :

माझे नाव : अनिकेत सुनील बोत्रे
माझे वय : २९ वर्षे,
व्यवसाय : खासगी नोकरी
राहणार : अवसरी खुर्द, ता. आंबेगाव, जि. पुणे

## <u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती एस. आर. पाचारणे यांच्या मार्फत.</u>

१. दिनांक २२.१२.२०१८ रोजी मी लोणीला गेलो होतो. हांडे साहेबांनी केसेस करायच्या आहेत असे साहेबांनी फोनवर सांगितल्यामुळे मी लोणी गावाला गेलो होतो. माझेसोबत दुसरा पंच दत्तात्रय कु—हाडे होता. लोणी येथील हॉटेल राजेशाहीच्या पाठीमागे गेलो होतो. हॉटेल राजेशाहीच्या पाठीमागे आरोपी खुर्चीवर बसून देशी व विदेशी दारू विकत असल्याचे मी बघितले होते. सदरची एकूण दारू दीड ते दोन हजार रूपयांची होती. हांडे साहेबांनी आरोपीकडून देशी दारूच्या व विदेशी दारूच्या बॉटल माझेसमक्ष जप्त केल्या. हांडे साहेबांनी माझेसमक्ष जप्ती पंचनामा केला होता. आता मला घटनाास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी पंच क्र. १ म्हणून सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे त्याला **निशाणी क्र. १८** देण्यात येते. आरोपीकडून जप्त केलेला मुददेमाल मी बघितला होता. परंतु तो जप्त मुददेमाल मला दाखविला तर मी ओळखू शकतो. आरोपीला पंचनामा करताना मी बघितले होते. आरोपीला आज बघितले तर मी ओळखू शकत नाही.

## <u>उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. एम. के. वळसेपाटील यांचे मार्फत</u>

२. हे म्हणणे खरे आहे की पंचनामा करण्यासाठी मला लेखी नोटीस देण्यात आली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की राज्य उत्पादन शुल्काच्या कर्मचा—याशी माझी ओळख आहे. नारायणगाव पासून लोणी वीस किलोमीटर अंतरावर आहे. ज्या वाहनाने मी घटनास्थळार गेलो होतो त्या वाहनाचा नोंदणीकृत क्रमांक मला सांगता येणार नाही. हॉटेल राजेशाहीचा ग्रामपंचायत मिळकत क्रमांक मला सांगता येणार नाही. हॉटेल

राजेशाहीच्या चर्तुसीमा मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपीकडून जप्त केलेल्या मालाचे निश्चित वर्णन मला सांगता येणार नाही. आरोपीकडून जप्त केलेल्या मालाचे बॅच क्रमांक मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की दुसरा पंच दत्तात्रय कु—हाडे याच्यासुध्दा ब—याच केसेसमध्ये पंच म्हणून सहया आहेत. हॉटेल राजेशाहीचे बांधकाम किती चौ.फुट आहे व त्यामध्ये किती खोल्या आहेत हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की सरतपासणीतील संपूर्ण मजकूर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की माझेसमक्ष पंचनामा केला नाही व आरोपीकडून काहीही मुददेमाल जप्त केला नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपीकडून जप्त केलेला मुददेमाल आज न्यायालयासमक्ष नाही. हे म्हणणे खरे नाही की मी पंचनाम्यावर राज्य उत्पादन शुल्काच्या कार्यालयातच सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत

दिनांक : १७/०२/२०२० (एन. डी. मेश्राम)
घोडेगाव न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग